म.जा.क्र. जिसवका/ ८६२ /२०१२
जिल्हा सरकारी वकील यांचे कार्यालय, रत्नागिरी
दिनांक :- २७ / ११ / २०१२

विधी व न्याय विभाग
आवक क्रमांक .१.५५५.).२०१२
दिनांक ..२/१२/१२......
शाखा .....का.-२१.....

प्रति,

मा. सू.बी. दळवी,
कार्यासन अधिकारी,
विधी व न्याय विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

विषय :- नागरिकांची सनद प्रसिध्द करणे हा विषय सन २०१२-१३ साठीच्या KRA मध्ये समाविष्ट करण्याबाबत ..

संदर्भ :- क्र. संकीर्ण २०१२/१७०२/प्र.क्र. ९९/का.२१ दिनांक १६ नोव्हेंबर, २०१२ रोजीचे पत्र.

आ. महोदय,

वरील संदर्भिय विषयास अनुसरुन कळविणेत येते की, प्रधान सचिव (प्र.सु. व र.व.का.) यांच्या क्र. नासद-२०११/प्र.क्र. १७/१८-अ, दि. ८ फेब्रुवारी, २०१२ अन्वये व जनहित याचिका क्र. ५०/२०११ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी दिलेल्या आदेशानुसार तसेच पत्र क्र. संकीर्ण २०१२/प्र.क्र. २४/१८ (र.व.का.) दिनांक ३० एप्रिल, २०१२ चे पत्रानुसार नागरिकांची सनद विहीत नमुन्यात नोटीस बोर्डावर यापूर्वीच प्रसिध्द करणेत आलेली आहे. त्याची माहिती व सी.डी. यासोबत पाठविणेत येत आहे.

आपला विश्वासू

(स्वाक्षरी)
जिल्हा सरकारी वकील
रत्नागिरी.

## -: नागरिकांची सनद :-

| | | |
|---|---|---|
| शासकीय कार्यालयाचे नांव | : | जिल्हा सरकारी वकील,<br>जिल्हा सरकारी वकील कार्यालय,<br>पहिला मजला] जिल्हा न्यायालय, रत्नागिरी |
| शासकीय व्यवस्थेतील खात्याचे स्थान | : | विधी व न्याय विभागांतर्गत दिवाणी स्वरुपाच्या प्रकरणांचे व अभियोग यंत्रणेचे व्यवस्थापन व नियंत्रण |
| कार्यालयातर्फे पुरविण्यात येणाऱ्या सेवा | : | दिवाणी स्वरुपाच्या प्रकरणांचे व अभियोग यंत्रणेचे व्यवस्थापन व नियंत्रण |
| कोणत्या कायद्यानुसार / नियमानुसार / शासन निर्णयानुसार | : | शासन निर्णय मा. मुख्या सचिव यांचे क्रमांक नासद-१०११/ प्र.क्र. १७२/१८-अ दि. ६/९/२०११ चे परिपत्रक |
| कार्यालयाच्या सेवा कोणाला दिल्या जातात | : | फौजदारी न्यायालयातील फौजदारी खटल्याचे कामकाज अभियोग पक्षाच्या वतीने चालविणे.<br>दिवाणी न्यायालयातील दिवाणी प्रकरणांचे कामकाज शासनाचे वतीने चालविणे. |
| या सेवा कोण देते व कशा प्रकारे | : | जिल्हा सरकारी वकील कार्यालयांअंतर्गत जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता हे सत्र न्यायातयातील प्रकरणे, जिल्हा न्यायालयातील प्रकरणे, दिवाणी न्यायालय (व.स्तर) यांचे न्यायालयातील प्रकरणे चालवितात, तसेच दिवाणी न्यायालयातील (क.स्तर) निवडणूक अर्जा संदर्भातील प्रकरणे चालवितात. |

| | | |
|---|---|---|
| या सेवा दिल्या गेल्या नाहीत तर दाद कोणाकडे मागावयाची | : | विधी व न्याय विभाग, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई |
| तक्रार करण्यासाठी कोणती बंधने असतील | : | तक्रार करण्यासाठी कोणतीही बंधने नाहीत. |
| सेवा पुरविण्याच्या कार्यपध्दतीचे मुल्यांकन | : | सरकारी वकील व अभियोक्त्यांच्या कार्यपध्दतीचे मुल्यांकन करण्यासाठी जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता, हे जिल्हा पातळीवर मा. सचिव, विधी व न्याय विभाग, मुंबई, महाराष्ट्र राज्य हे विभाग प्रमुख असून अंतीम मुल्यांकन त्यांच्या स्तरावर होते. |
| नागरिकांच्या कार्यालयाकडून काय अपेक्षा आहेत | : | न्यायदान प्रक्रियेत सहकार्य करुन योग्य ते न्यायनिर्णय होण्यास मदत करणे. |
| कार्यालयातील कार्यरत अधिकारी व त्यांची श्रेणी | : | जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता, अ वर्ग<br>सहाय्यक सरकारी व वकील व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता, अ वर्ग |

**तक्रारींचे निवारण :-**

| | | |
|---|---|---|
| तक्रार निवारणासाठी संपर्क अधिकारी | : | सरकारी वकील व सरकारी अभियोक्त्यांच्या कामकाजा बाबत अथवा कार्यपध्दीती बाबत तक्रार असल्यास खालील अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा -<br>१. **जिल्हा पातळीवर** - जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता.<br>२. **मुख्यालय पातळीवर** - मा. सचिव, विधी व न्याय विभाग, मुंबई. |

नागरिकांची सनद उपलब्ध करण्यात आली असून, नागरिकांचे याबाबत काही मत अथवा टिप्पणी असल्यास ते उपरोक्त नमूद पत्त्यावर कळविण्यात यावे. नागरिकांच्या सूचना स्वागतार्ह आहेत.

"सनदेत दिलेले वचन पूर्ण करण्यासाठी वचन कार्यालय आणि ज्यांना वचन दिले आहे त्यांच्याशी बांधील आहे."

**जिल्हा सरकारी वकील व**
**सरकारी अभियोक्ता, रत्नागिरी**